# कुपोषण व इतर राजकीय घडामोडी

## चन्द्रशेखर पुरन्दरे

एखादा देश आर्थिकदृष्ट्या प्रगत होत असला तरी त्याचा इष्ट परिणाम लोकांचे आरोग्य सुधारण्यात होतोच असे नाही. म्हणजे देशाचा वाढता विकासदर हे जनतेच्या आरोग्याचे गमक नसते. हा मुद्दा माहिती असला तरी वारंवार अधोरेखित करणे आवश्यक आहे.

विशेषत: भारताच्या वाढत्या विकासदराचा गेली काही वर्षे उद्घोष होत आहे. त्या संदर्भात ही बाब लक्षात ठेवावी. वाढता विकासदर मानवी जीवनमान सुधारतो हे गृहीतक इतर अनेक क्षेत्रातही खोटे ठरले आहे. [ग्रामीण-शहरी विकासातील तफावत, अति-दारिद्र्याचे निर्मूलन, इत्यादी]; अनारोग्य त्याचाच भाग. भारतातील कुपोषणाचे दुष्परिणाम हा या लेखाचा उद्देश नाही पण पुढील आकडे पुरेसे बोलके आहेत. भारतातील पुनरुत्पादनक्षमता असलेल्या निम्म्याहून अधिक स्त्रियांना anaemia असतो. [जागतिक स्तरावर एक-तृतीयांश] साडेचार कोटींहून जास्त मुलांची वाढ खुंटलेली असते. कारण त्यांच्या मेंदूची वाढ कुपोषणामुळे नीट झालेली नसते. ती बौद्धिक क्षेत्रात मागे पडतात. सामान्यत: ज्यांचे कुपोषण होत नाही अशातील एक-तृतीयांश मुले गरीबीतून बाहेर पडायला कुपोषित मुलांपेक्षा अधिक सक्षम असतात. कारण ती शिकतात, त्यांचे आरोग्य चांगले असते आणि ती उद्या त्यांच्या देशाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावू शकतात.

जागतिक आहार अहवाल कुपोषणाचे तीन परिणाम मानतो. लहान मुलाची वाढ खुंटणे - जगभर पाच वर्षांखालील सुमारे १५ कोटी मुले - हा पहिला प्रकार. दुसरा म्हणजे वजन व उंची याचे प्रमाण असावे त्यापेक्षा व्यस्त असते. [५ कोटी मुले] आणि विकार म्हणता येईल इतकी स्थूलता. [जवळ-जवळ चार कोटी मुले] या कारणांमुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढते. हे सगळे प्रकार मुलाच्या पहिल्या दोन वर्षातील आबाळीमुळे होतात आणि त्यांनी झालेली हानी कधीच भरून निघत नाही. अशी मुले पंगुत्वातच सगळं आयुष्य व्यतीत करतात.

बहुतेक देशांत यातील एक किंवा दोन प्रकार आढळतात. पण सहारा वाळवंटाच्या दक्षिणेच्या आफ्रिकेतील देशांत तिन्ही प्रकार आढळतात. अशा मुलांची संख्या काही लाखात आहे. गेल्या दहा वर्षांत वाढ खुंटलेल्या मुलांची टक्केवारी कमी झाली असली तरी एकूण लोकसंख्येच्या वाढीमुळे अशा मुलांची प्रत्यक्ष संख्या वाढलेलीच आहे. २०३० पर्यंतचे उद्दिष्ट जागतिक कुपोषण नष्ट व्हावे असे होते. पण आज आफ्रिका खंड त्याच्या जवळपासही दिसत नाही. हे उद्दिष्ट प्राप्त न होण्याची अनेक कारणे आहेत. ती एकाच वेळी अशी परिस्थिती निर्माण करतात. युद्धे व इतर अंतर्गत हिंसाचार, पर्यावरणाची हानी, सरकारची अक्षमता, लोकांचे अज्ञान व ते दूर करण्याच्या प्रयत्नांचा अभाव किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष, वगैरे. यातील बहुतेक कारणे व प्रक्रिया भारतातही आढळतात.

म्हणजे मोठ्या प्रमाणावर राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इच्छाशक्ती व भांडवल असल्याखेरीज या प्रश्नावर दीर्घकालीन तोडगा निघणे कठीण आहे. परदेशी मदत अल्प-काळापुरती असते व तिच्यातही स्थानिक नोकरशाहीचे अडथळे, भ्रष्टाचार येऊ शकतात. शिवाय जेथे सामाजिक अशांतता असते तेथे मदत पाठवायला परदेशी संस्था नाखूष असतात. म्हणजे अशा प्रदेशातील मुलांचे दुहेरी हाल होतात.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, आफ्रिकेच्या या भागाची एकूण आर्थिक प्रगती जरी ढोबळमानाने समाधानकारक असली तरी देशांतर्गत विभिन्न भागात तीव्र तफावती आढळतात. त्या राष्ट्रीय स्तरावरच्या संख्याशास्त्रीय तक्त्यात प्रतिबिंबित होत नाहीत.

कुपोषणाच्या या त्रोटक नोंदीनंतर जगातील अति-श्रीमंत कशा कशा प्रकारे पैसे खर्च करतात हे तुलनेसाठी पहावे. त्यासाठी एक अमेरिकन डॉलर म्हणजे ७० रुपये हे लक्षात ठेवावे. न्यूयॉर्कमधील एका रेस्टोरंटमध्ये बर्गर २९५ डॉलर्सला विकला जातो आणि आईसक्रीम १००० डॉलर्सला. दुबईतील एक रेस्टॉरंट खऱ्या सोन्याच्या वेष्टनात १००० डॉलर्सला

केक विकते. २०१८ च्या आकडेवारीनुसार अमेरिकेतील ६०% पाळीव मांजरे व ५६% पाळीव कुत्री अतिलठ्ठ आहेत. पाळीव प्राण्यांची अति-स्थूलता ही तेथे 'चिंताजनक' समस्या आहे. महागड्या दुर्मिळ वस्तूंचा लिलाव करणारी सोथेबी नावाची जागतिक कंपनी आहे. तिने गेल्या वर्षी एका दुर्मिळ मद्याच्या बाटलीचा लिलाव केला. ती बाटली ५ लाख ५८ हजार डॉलर्सला विकली गेली. यावरून जगाच्या उफराट्या मूल्यव्यवस्थेचा अंदाज यावा.

**सौदी अरेबिया**

मार्च २०१९च्या 'आंदोलन'मध्ये जमाल खाशोगी या सौदी अरेबियन राजवट-विरोधकाच्या हत्येची नोंद घेतली होती. ती तुर्कस्तानमध्ये सौदी वकिलातीत करण्यात आली. याबाबाबतचा संयुक्त राष्ट्रसंघाचा अहवाल १९ जूनला प्रसिद्ध झाला. त्यानुसार या हत्येला सौदी राजवट व राजपुत्र बिन सलमान व्यक्तिशः जबाबदार होता असे म्हणण्यास वाव आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिफारशीनुसार या प्रकरणाची तटस्थ चौकशी व्हावी, राजवटीने खाशोगीच्या कुटुंबियांना भरपाई द्यावी, तसेच राजपुत्र बिन सलमान याची परदेशातील मालमत्ता गोठवावी, त्याबरोबरच सध्या सौदीत या हत्येच्या आरोपाखाली चालू असलेला ११ जणांवरील खटला रद्द करावा. कारण यातून न्याय निष्पन्न होणं कठीण आहे. [तो खटला देखावा म्हणून केवळ आंतरराष्ट्रीय निषेधामुळे उभा राहिला होता.]

**हाँगकाँग**

हाँगकाँग ही आधी ब्रिटिश वसाहत होती. ती जुलै, १९९७ला चीनला हस्तांतरित झाली. तेव्हा एक राष्ट्र दोन राज्यपद्धती असे तत्त्व मांडले गेले. म्हणजे चीनमध्ये एकाधिकारशाही तर हाँगकाँगमध्ये लोकशाही राहणार. हे तत्त्व म्हणजे चीनची आंतरराष्ट्रीय मताला थोडेफार सामावून घेण्याची खेळी होती, हे लवकरच स्पष्ट होऊ लागले. हाँगकाँगमध्ये बीजिंगच्या नियंत्रणाने सरकार आणणे व चीनसारखी एकाधिकारशाही प्रस्थापित करणे हा खरा उद्देश होता. त्याला अनुसरून पावले पडत गेली. चीनने आजवर हाँगकाँगमधून [व इतर देशातूनही] लोकशाहीची मागणी करणारे राजकीय विरोधक, चीनवर टीका करणारे पुस्तक विक्रेते इ. व्यक्तींना पळवून चीनमध्ये नेले आहे. तेथे दिखाऊ 'खटला' चालवला जातो व तुरुंगवास दिला जातो. आता हाँगकाँगमधून अशा लोकांना राजरोस नेता यावे म्हणून एक विधेयक करण्याचा प्रस्ताव पुढे आला. तो कायदा करून हाँगकाँगवर तो लादण्याचा चीनचा प्रयत्न आहे. त्याला विरोध म्हणून जूनमध्ये सुमारे दहा लाख लोक त्याविरुद्ध रस्त्यावर आले. त्यांनी चिकाटीने हा निषेध सार्वजनिकरित्या व्यक्त केला. हाँगकाँगमधला हा सर्वात मोठा निषेध. अखेर त्यापुढे सरकारला माघार घ्यावी लागली व विधेयकाचा प्रस्ताव रद्द करण्यात आला. आता विरोधकांची मागणी अध्यक्षाने राजीनामा द्यावा ही आहे.

याबाबत चीनची भूमिका लक्षणीय राहील कारण हा चीनचा सरळ सरळ निषेध आहे.

**ब्रिटन**

Brexit, म्हणजे ब्रिटनने युरोपिअन युनिअनमधून बाहेर पडावे का नाही हा वर्तमान वाद. या वादाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटनच्या पंतप्रधान तेरेसा मे यांनी आपल्या पदाचा सात जूनला राजीनामा दिला. याबाबत आपण अपयशी ठरलो हे त्यांनी मान्य केले. यामुळे तेथील राजकारण आणखीच गोंधळात गेले आहे. आता सत्तारूढ हुजूर पक्ष नवीन पंतप्रधान निवडेल. ती प्रक्रिया चालू आहे. पुढच्या काही दिवसात ते चित्र स्पष्ट व्हावे. सुरुवातीला असलेली ११ इच्छुक उमेदवारांची संख्या हा लेख लिहिण्याच्या वेळी तीनवर आली आहे. त्यातील बोरिस जॉन्सन हा प्रमुख दावेदार ब्रिटनचा 'ट्रम्प' मानला जातो.

पंतप्रधान कोण यापेक्षा ब्रिटन युरोपमध्ये राहणार का नाही? राहिल्यास काय अटींवर? स्कॉटलंड, उत्तर आयर्लंड ब्रिटनमधून बाहेर पडतील का? इत्यादी प्रश्न याच्याशी निगडीत आहेत. निर्वाचित लोकशाही टोकाला गेली तर काय होऊ शकते याचे हे उदाहरण. कारण निर्वाचितांवर मतदारांचे नियंत्रण रहात नाही आणि मतदार नेहेमीच सूज्ञ असतो हे गृहीतक संशयास्पद आहे. आता ब्रिटन ग्रेट राहतो का नाही हे लवकरच दिसेल.

नुकत्याच झालेल्या युरोपिअन युनिअनच्या निवडणुकीतील अति-उजव्या पक्षांचे युरोपभर वाढलेले बळ हाही याबरोबर चिंताजनक संकेत आहे.

art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk